भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र.३१९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०९/०५/२०१७

**१) मध्यम प्रकल्प उपविभाग कार्यालयातील खिडकीचे लोखंडी दोन गज कापुन आत प्रवेश करुन संगणक व प्रिंटरची चोरी .:—**

दिनांक ०७/०५/२०१७ ते ०८/०५/२०१७ चे १८.०० ते ०८.२० वा. दरम्यान यातील चौकीदार विलास कापगते रा. साकोली यांनी सांगीतल्या नुसार फिर्यादीने कार्यालयाची पाहणी केली असता कोणीतरी अज्ञात चोराने मध्यम प्रकल्प उपविभाग साकोली चे मागील बाजुने खिडकीचे लोखंडी दोन गज कापुन आत प्रवेश करुन त्यात ठेवलेले १ संगणक एचपी कंपनीचा, कॅनाल कंपनीचा १ प्रिंटर, १ ब्रदर कंपनीचा प्रिंटर असा एकुण २८,०००/—रु. चा माल कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी अमोल भारत चांपडे वय २५ वर्ष, प्रगती कॉलोनी सेंदुरवाफा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. साकोली येथे कलम ४५७,३८० भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) अज्ञात चोराने उभ्या कारमधुन १ लॅपटॉप व हॉर्डडिक्सची चोरुन नेल्याने गुन्हा नोंद .:—**

दिनांक २८/०३/२०१७ चे १५.०० ते १६.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी युवराज शिवाजी शहारे वय ५८ वर्ष, रा. दिन प्रजाहीत कॉलोनी नरेन्द्र नगर प्लॉट नं. २५ नागपुर हे सेंदुरवाफा येथे कुंटुबासह आपली मेंट्रो कार एमएच ३१ सीआर ०३९२ ने साक्षी ज्ञानेश्वर शहारे रा. सेंदुरवाफा यांचे लग्नाची पुर्व तयारी करीता आले होते ती कार बाबुदासजी बोरकर यांचे घरा समोर गल्लीत ठेवले असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन कारचे मागचे सिटवर ठेवलेला १ एचपी कंपनीचा लॅपटॉप पोर्टेबल हार्डडिक्स जुनी, असा एकुण २८,०००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोस्टे. साकोली येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भजने पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) स्विप्ट डिझायर गाडी चालकांच्या हयगयीने मोटार सायकलला धडक देवुन दोघांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद .:—**

दिनांक ०८/०५/२०१७ चे ०९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी पुणेश्वर विलास गवरे वय ३० वर्ष, रा. शाहीनगर वाडी नागपुर याचा लहान भाऊ जखमी आशिष विलास गवरे वय २१ वर्ष व आई सौ. मंगला विलास गवरे वय ४८ वर्ष, रा. दोन्ही रा. नागपुर असे दोघेही मिळुन मोटार सायकल क्र. एमएच ३१ ईजे ४७५३ ने डबलसीट एनएच ०६ रोडवरुन राजेगाव एमआयडीसी बसस्टॉप रोड क्रॉस करीत असता लाखनी कडुन भंडारा कडे जाणाऱ्या यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन बेदरकारपने व हयगयीने चालवुन मोटार सायकला एनएच ०६ रोड खुटसावरी येथे धडक मारुन दोघांनाही जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे. लाखनी येथे कलम २७९,३३७ भांदवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. थेर पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

४) औषधोपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु.  :–

दिनांक १८/०४/२०१७ चे २०.४५ वा दरम्यान यातील मृतक श्रीमती शकुंतला राधेशाम दुबे वय ७५ वर्ष, रा. लाखनी हीला दिनांक १८/०४/२०१७ चे २०४५ वा. दर. डावे पायाला काहीतरी चावल्याचा भास झाल्याने काय चावले त्या बाबत माहीत नाही तीचे सोबतच्या व्यक्तीला सांगीतल्या वरुन तिला त्याने औषधोपचारा करीता खाजगी दवाखाण्यात नेले व प्रकृती जास्त बिघडल्याने सोबतच्या व्यक्तीने मेओ हॉस्पीटल नागपुर येथे आयसीयु मध्ये भरती केले असता उपचारा दरम्यान वार्ड चे एच.ओ. डॉ. सुजन मुदंनवार यांनी दिनांक २०/०४/२०१७ ला १९.३० वा. मृत घोषीत केल्याने डॉ. मेमो वरुन पो.स्टे. तहसील नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ चे कागदपत्र टपाल व्दारे प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. टेभुर्णे यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहे

५) डयुटी संपवुन मोटार सायकलने घरी जात असतांना अंगावर झाडाचा फांदा पडुन जखमी झाल्याने इसमाचा मृत्यु .  :–

दिनांक ०७/०५/२०१७ चे २२.३० वा दरम्यान यातील मृतक राजु ईस्तारी खराबे वय ५० वर्ष, रा. महालगाव ता. मौदा जि. नागपुर हा आपली डयुटी संपवुन स्वतःचे घरी जात असतांना वादळ वारा, विजेचा कडकडाट होऊन रोडवरील झाडाचा फांदा त्याचे मोटार सायकल व अंगावर पडुन जखमी झाल्याने त्यास जखमी अवस्थेत सामान्य रुग्णालय भंडारा येथे औषधोपचारा करीता आनले असता डॉक्टरानी तपासुण मृत घोषीत केल्याने डॉ. मेमो वरुन व मृतकचे पत्नीचे बयाना वरुन सरतर्फे फिर्यादी पोना. टेंभुर्णे यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. फुंडे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहे

६) अवैध दारु अडयावर धाडी .  :–

दिनांक ०८/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे. साकोली, पालांदुर व पवनी येथे अवैध दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०३ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ११ लिटर १६० मिली.लीटर देशी दारू + १ मोटार सायकल किंमती ६,३२५/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ०८/०५/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुन १०४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून तीन सिटर वाहनांवरती १९ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ८५ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.